

पुस्तक विक्रीला अत्यावश्यक सेवेत समाविष्ट करण्याची मागणी

प्रकाशकांची उच्च न्यायालयात याचिका

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : पुस्तकांमुळे माणसाला भावनिक, मानसिक व सकारात्मक आधार मिळतो. सध्याच्या नकारात्मक स्थितीत पुस्तके नागरिकांचे शारीरिक आणि मानसिक आरोग्य चांगले राखण्यासाठी उत्तम पर्याय ठरू शकतात. त्यामुळे पुस्तकांचा अत्यावश्यक सेवेत समावेश करून त्यांच्या विक्रीला परवानगी देण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी करणारी जनहित याचिका उच्च न्यायालयात करण्यात आली आहे.

प्रतिष्ठेसह जीवन जगण्याच्या हक्काचा व अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा विचार करता त्यात पुस्तकांचा महत्वाचा वाटा आहे, असे याचिकेत नमूद करण्यात आले आहे. 'मराठी प्रकाशक परिषदे'ने ॲड्. असीम सरोदे, पूर्वा बोर्डे व अजिंक्य उडाणे यांच्यामार्फत ही याचिका केली असून पुढील आठवड्यात त्यावर सुनावणी होण्याची शक्यता आहे. याचिकेत केंद्र सरकारचे ग्राहक मंत्रालय व महाराष्ट्र सरकारच्या मुख्य सचिवांना प्रतिवादी करण्यात आले आहे.

न्यायालयान याचिकेची दखल घेत पुस्तकांना जीवनाचा अभिभाज्य भाग म्हणून मान्यता द्यावी तसेच त्यांचा अत्यावश्यक सेवेत समावेश करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. आधीच विवंचनेत असलेल्या प्रकाशन व्यवसाय टाळेबंदीमुळे आर्थिक संकटात सापडला आहे. त्याचाही विचार करण्याची विनंती याचिकेत करण्यात आली आहे.

अमेरिकेतील मोहिमेचा दाखला

मागणी आणि दाव्याच्या समर्थनार्थ याचिकाकर्त्यांनी अमेरिकेत टाळेबंदीदम्यान पुस्तकांबाबत राबवण्यात आलेल्या मोहिमेचा दाखला दिला आहे.

म्हणणे काय?

करोनाच्या पार्श्वभूमीवर गेल्या वर्षी जाहीर झालेल्या टाळेबंदीत पुस्तक विक्रीवरही बंदी घालण्यात आली. पुस्तक विक्री बंद करणे उचित नाही. शिक्षण हा मूलभूत हक्क आहे, तर ज्या पुस्तकांच्या माध्यमातून आपण शिक्षणाचा हक्क प्रत्यक्षात बजावतो त्या पुस्तकांची विक्री हाही आवश्यक सेवेचा भाग समजण्यात यावा. पुस्तकांना 'अत्यावश्यक वस्तू' म्हणून मान्यता देण्याची आमची मागणी नाही. परंतु पुस्तक विक्री 'अत्यावश्यक सेवा' म्हणून समजण्यात यावी आणि त्यानुसार 'अत्यावश्यक सेवा' कायद्यात त्याचा समावेश करावा.

राज्यात ६६,८३६ नवे रुग्ण

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : करोनाचा प्रादुर्भाव झाल्यापासून शुक्रवारी राज्यात एका दिवसात सर्वाधिक ७७३ रुग्णांच्या मृत्यूची नोंद झाली तर ६६,८३६ नवे रुग्ण आढळले.

सरकारी आकडेवारीनुसार २४ तासांत ७७३ जणांचा मृत्यू झाल्याचे दाखविण्यात आले असले तरी त्यापैकी २२४ मृत्यू हे गेल्या आठवड्यातील आहेत. १८९ मृत्यू हे एक आठवड्यापेक्षा अधिक कालावधीतील आहेत. मृतांचा आकडा लपविला जातो किंवा खरी माहिती पुढे येत नाही, असा आरोप भाजप नेत्यांकडून नेहमी केला जातो. मात्र एका दिवसात ७७३ जणांच्या मृत्यूची नोंद होणे हा आतापर्यंतचा उच्चांक ठरला आहे. राज्यात सध्या ६ लाख ९१ हजार रुग्ण उपचाराधीन आहेत. तर दिवसभरात ७४,०४५ रुग्ण बरे होऊन घरी परतले. याचाच अर्थ नव्या रुग्णांपेक्षा बरे होण्याचे प्रमाण अधिक होते. गेल्या २४ तासांत मुंबईत ७१९९, नाशिक शहरात १८५७, नाशिक जिल्ह्यात १५५८, नगर जिल्ह्यात ३५०९, पुणे शहरात ४५३६, पिंपरी-चिंचवडमध्ये २३९७, उर्वरित पुणे जिल्ह्यात २९३०, यवतमाळमध्ये १५३६, नागपूर शहरात ५४२६, उर्वरित नागपूर जिल्ह्यात २५४४ नवे रुग्ण आढळले.

मुंबईत आणखी ७ हजार २२१ बाधित

मुंबईत दैनंदिन मृतांची संख्या वाढू लागली आहे. शुक्रवारी ७२ रुग्णांचा मृत्यू झाला. रुग्णांची संख्या मात्र कमी होत असून शुक्रवारी ७ हजार २२१ नव्या रुग्णांची नोंद झाली. चाचण्यांच्या तुलनेत बाधितांचे प्रमाण १७.२६ टक्के होते. मात्र करोनामुक्त रुग्णांची संख्याही वाढत असून ८४ टक्के रुग्ण करोनामुक्त झाले आहेत.

मुंबईतील एकूण बाधितांची संख्या ६ लाख १६ हजार झाली आहे, तर मृतांची एकूण संख्या १२ हजार ६४८ झाली आहे. एका दिवसात नव्या रुग्णांपेक्षा जास्त म्हणजे ९ हजार ५४१ रुग्ण बरे झाल्यामुळे आतापर्यंत ५ लाख २० हजार ६८४ म्हणजेच ८४ टक्के रुग्ण करोनामुक्त झाले आहेत. रुग्णसंख्या वाढू लागल्यामुळे हा दर ७९ टक्क्यांपर्यंत कमी झाला होता. आता हा दर वाढून ८४ टक्के झाला आहे. मुंबईतील उपचाराधीन रुग्णांची संख्याही आता कमी होऊ लागली आहे. ही संख्या ९२ हजारांपुढे गेली होती. ती आता ८१ हजार ५३८ झाली आहे. त्यापैकी गंभीर रुग्णांची संख्या १ हजार ४३२ झाली आहे.

करोनाचे रुग्ण वाढत असल्यामुळे मुंबईतील चाचण्यांचे प्रमाणही वाढवण्यात आले आहे. गुरुवारी ४१ हजार ८२६ चाचण्या करण्यात आल्या. त्यापैकी सुमारे १७.२६ टक्के नागरिक बाधित आढळले. आतापर्यंत ५१ लाखांहून अधिक चाचण्या करण्यात आल्या आहेत.

मुंबईतील रुग्णवाढीचा दर आता कमी होऊ लागला आहे. सध्या हा दर १.३१ टक्के आहे. तो दोन टक्क्यांपर्यंत पोहोचला होता. रुग्ण दुपटीचा कालावधीही ५२ दिवसांवर पोहोचला आहे.

ठाणे जिल्ह्यात शुक्रवारी ५ हजार ९२ करोनाबाधित रुग्ण आढळून आले. ५६ जणांचा मृत्यू झाला.

टाटा आमंत्रा करोना केंद्रातून दोन कैद्यांचे पलायन

ठाणे : कल्याण येथील टाटा आमंत्रा करोना केंद्रातून दोन कैदी पळल्याचा प्रकार शुक्रवारी उघडकीस आला आहे. याप्रकरणी कोनगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कल्याण येथील आधारवाडी कारागृहात दोन कैदी करोनाबाधित झाले होते. त्यांच्यावर कल्याण येथील टाटा आमंत्रा केंद्रात उपचार सुरू होते. शुक्रवारी पहाटे त्यांनी पळ काढला.

देशात रुग्णवाढीचा चढता आलेख कायम

३.३२ लाखांहून अधिक जणांना लागण

नवी दिल्ली : देशातील रुग्णवाढीचा चढता आलेख सलग दुसऱ्या दिवशीही कायमच होता. करोनाबाधितांच्या संख्येत सातत्याने वाढ होत असून सलग दुसऱ्या दिवशी २४ तासांत आणखी ३.३२ लाख जणांना करोनाची लागण झाली. हा एका दिवसातील उच्चांक असून त्यामुळे बाधितांची एकूण संख्या एक कोटी ६२ लाख ६३ हजार ६९५ वर पोहोचली आहे. तर उपचाराधीन रुग्णांच्या संख्येने २४ लाखांचा टप्पा ओलांडला असून एका दिवसात आणखी २२६३ जणांचा करोनामुळे मृत्यू झाला आहे, असे शुक्रवारी केंद्रीय आरोग्य मंत्रालयाच्या वतीने सांगण्यात आले.

देशात गेल्या एका दिवसात आणखी तीन लाख ३२ हजार ७३० जणांना करोनाची लागण झाली, तर २२६३ जणांचा मृत्यू झाल्याने मृतांची एकूण संख्या एका लाख ८६ हजार ९२० वर पोहोचली आहे. उपचाराधीन रुग्णांच्या संख्येतही सातत्याने वाढ होत असून सध्या देशात २४ लाख २८ हजार ६१६ उपचाराधीन रुग्ण आहेत. हे प्रमाण एकूण बाधितांच्या १४.९३ टक्के इतके आहे. तर करोनातून बरे होण्याचे प्रमाण ८३.९२ टक्के झाले आहे. आतापर्यंत एक कोटी ३६ लाख ४८ हजार १५९ जण करोनातून बरे झाले असून मृत्युदर आणखी घसरून १.१५ टक्के इतका झाला आहे.

ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. अरुण निगवेकर यांचे निधन

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू, विद्यापीठ अनुदान आयोगाचे (यूजीसी) माजी अध्यक्ष, ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. अरुण निगवेकर यांचे दीर्घ आजाराने शुक्रवारी पुण्यात निधन झाले. ते ७९ वर्षांचे होते. त्यांच्या मागे पत्नी, दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. देशातील उच्च शिक्षणाची गुणवत्ता उंचावण्यात, शिक्षणाचे आंतरराष्ट्रीयीकरण करण्यात त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले होते.

डॉ. निगवेकर १९७७ मध्ये पुणे विद्यापीठात भौतिकशास्त्राचे प्राध्यापक म्हणून रुजू झाले. विद्यापीठातील बहुमाध्यम संशोधन केंद्राचे संचालक म्हणून ९०च्या दशकात काम केले. तसेच त्यांनी संज्ञापन शास्त्र विभागाची विद्यापीठात स्थापना केली. त्यानंतर १९९८ ते २००० या कालावधीत त्यांनी पुणे विद्यापीठाचे कुलगुरूपद भुषवले. त्यानंतर २००० ते २००५ या कालावधीत यूजीसीचे उपाध्यक्ष व अध्यक्ष म्हणून जबाबदारी निभावली. देशातील शंभर विद्यापीठांची निवड करून या विद्यापीठांना इलेक्ट्रॉनिक संशोधनपत्रिकांचा वापर करण्याची मुभा देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. नॅशनल असेसमेंट अँड ॲक्रिडिटेशन कौन्सिलचे (नॅक) ते संस्थापक संचालक होते. देशातील उच्च शिक्षणाच्या गुणवत्तेचे मूल्यमापन करण्याचे निकष आणि पद्धती त्यांनी निश्चित केली होती. त्यानुसार देशभरातील महाविद्यालये आणि विद्यापीठांचे मूल्यांकन केले जाते.

लोणार सरोवराच्या संवर्धन समितीच्या अध्यक्षपदी डॉ. निगवेकर यांची राज्य सरकारने नियुक्ती केली होती. शिक्षण क्षेत्रातील योगदानासाठी त्यांना विविध पुरस्कार प्रदान करण्यात आले होते. त्यांच्या निधनाबद्दल मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी शोक व्यक्त केला .

पश्चिम रेल्वे
जुन्या कोचेसना कॅम्पिंग कोचमध्ये रुपांतरित करणे
पश्चिम रेल्वेचे मुख्य अभियंता, चर्चगेट यांनी खालील ई-खरेदी निविदांना आमंत्रित केले आहे: **निविदा सूचना क्र. डब्ल्यू ६४१/२२/२०/३४ दि. २१/०४/२०२१. प्रस्तावित कामांचा तपशील:** ट्रॅक मशीनसाठी जुन्या कोचेसना कॅम्पिंग कोचमध्ये रुपांतरित करणे (२० नग). **एकूण निविदा किंमत:** ₹ ४,६२,५१,४१३/-. **इसारा रक्कम ठेव:** देय माफी. **ई-निविदा बॉक्स बंद होण्याची तारीख:** ११/०५/२०२१ रोजी **११:०० वाजता. ई-निविदा बॉक्स उघडण्याची तारीख:** ११/०५/२०२१ रोजी **११:१५ वाजता. टीप:-** (१) वरील ई-खरेदी निविदेच्या निविदा कागदपत्रासह संपूर्ण माहिती निविदा उघडण्याच्या तारखे पर्यंत https://ireps.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध आहे. (२) **वरील निविदांकरिता ई-बोली स्वरूपात इतर बोली स्वीकारल्या जाणार नाहीत.** विक्रेत्यांनी आयआरईपीएस वेबसाइटवर आयटी कायदा - २००० अंतर्गत सीसीएने जारी केलेल्या क्लास-III डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्रांसह स्वत: ची नोंदणी करणे आवश्यक आहे.
0045
आम्हाला फॉलो करा: twitter.com/WesternRly

मध्य रेल्वे
[illegible]
भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि करिता नामांकित कंत्राटदारांकडून www.ireps.gov.in या संकेतस्थळाद्वारा [illegible] या ई-बोली मागवत आहेत. **कामाचे नाव:** दोन वर्षांच्या कालावधीकरिता ई[illegible]जी ए[illegible] चबी टाइप ट्रेन्सच्या पॉवर कारमध्ये बसवि[illegible] [illegible]ए [illegible]टची ट्रब[illegible] शूटिंग व एन-रूट ऑपरेशन तसेच ट्रिप मेन्टेनन्स / ए-चेक. **(निविदा क्र. [illegible]एलटीटी.२०२०.०८आर) कामाचा अंदाजे खर्च:** रु. १९,९०,७४,९०९/-; **बयाणा प्रपत्रांची किंमत:** रु. १०,०००/-; **पूर्तता कालावधी:** २४ महिने; **वैधता:** ६० दिवस; **निविदा बंद करण्याची तारीख:** १७.०५.२०२१ रोजी दु. ०२.०० वा. **बोलीदारांकरिता सूचना: १.** निविदा बंद होण्याच्या तारखेनंतर उघडण्यात येतील. २. भावी बोलीदारांना विनंती करण्यात येते की, त्यांनी निविदांचा अधिक तपशील व शुद्धिपत्र, जर असल्यास, याकरिता www.ireps.gov.in या आमच्या संकेतस्थळाला भेट द्यावी. ३. बोलीदार केवळ www.ireps.gov.in या आमच्या संकेतस्थळाद्वारा इलेक्ट्रॉनिक पद्धतीत [illegible] ई-निविदेमध्ये भाग घेऊ शकतात आणि ई-निविदेच्या अनुसार प्रस्ताव प्रत्यक्ष सादर करण्यास अनुमती नाही. जर प्रस्ताव प्रत्यक्षरित्या सादर केले [illegible] असल्यास ते उघडण्यात येणार नाहीत किंवा विचारात घेतले जाणार नाहीत. ४. अधिक चौकशीकरिता संपर्क साधता येईल: वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (कोचिंग), ॲनेक्स बिल्डिंग, पहिला मजला, मध्य रेल्वे, सीएसएमटी मुंबई. ५. ही बोली रेल्वे बोर्ड लेटर नं. २०१५/आरएस(जी)/७७९/५ दिनांकित ०३.०८.२०१७ व २७.१२.२०१७ द्वारा प्रसारित, डिपार्टमेंट ऑफ इंडस्ट्रियल प्रमोशन ॲण्ड पॉलिसी, वाणिज्य मंत्रालय यांच्याद्वारा निर्गमित केलेल्या दिनांकित १५.०६.२०१७ पब्लिक प्रोक्युअरमेंट पॉलिसी (मेक इन इंडिया) ऑर्डर २०१७ चे अनुपालन करते.
[illegible] ई-बोली सूचना क्र. ०५/२०२१ २२.०४.२०२१ची
रेल्वे मदत हेल्पलाईन १३९
078

पश्चिम रेल्वे
एसी प्रतीक्षालयातील विविध कामे
अधिकारी: वरि. डीसीएम. ई-निविदा सूचना क्र. सीए ११_वेटिंगरुमबीव्हीआय दि. २२/०४/२०२१. कार्य व स्थान: मुंबई विभागाच्या बोरिवली स्थानक (बीव्हीआय), येथे ०५ (पाच) वर्षांच्या कालावधी करिता शीतपेये/हलके स्नॅक्सच्या वितरणासाठी आधुनिक सुखसोयी, सुविधा व युनिटसह एसी प्रतीक्षालयातील विकास, अपग्रेडेशन, नूतनीकरण, देखभाल व मॅनिंग करिता निविदा. **कामाची अंदाजे किंमत:** ५ वर्षासाठी ₹ ४२,०१,९७३/- (कर. इ. वगळता). **ईरठे:** ₹ ८४,१००/ -. **निविदा फॉर्म उपलब्ध असणारी वेबसाइट: www.ireps.gov.in ऑनलाईन सादरीकरण बंद करण्याची तारीख व वेळ:** २१/०५/२०२१ रोजी १५:०० वाजेपर्यंत. **ई-निविदा उघडण्याची तारीख व वेळ:** २१/०५/२०२१ रोजी १५:३० वाजता. **टीप:** निविदा दस्तऐवज, शुद्धीपत्रक व पुढील तपशीलांसाठी डाऊनलोड करण्यासाठी कृपया आमच्या **www.ireps.gov.in** या संकेतस्थळाला भेट द्या. निविदा आणि ईरठेची किंमत केवळ ऑनलाइन नेट बँकिंग किंवा ई-पेमेंट गेटवेद्वारे स्वीकारली जाईल. स्वत:ला अद्यतनित ठेवण्यासाठी बोलीदाराने नियमितपणे संकेतस्थळावर जावे.
0047
आम्हाला फॉलो करा: twitter.com/WesternRly

Reliance
Industries Limited
Growth is Life
नोंदणीकृत कार्यालय: ३रा मजला, मेकर चेंबर्स ४, २२२, नरिमन पॉइंट, मुंबई - ४०० ०२१
दूरध्वनी: ०२२-३५५५ ५००० • ई-मेल: investor.relations@ril.com
CIN: L17110MH1973PLC019786
सूचना
सिक्युरिटीज ॲण्ड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स ॲण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेन्ट्स) रेग्युलेशन्स, २०१५ मधील रेग्युलेशन ४७ सोबत वाचले असता रेग्युलेशन २९ अन्वये सूचना देण्यात येत आहे की, इतर मुद्यांबरोबरच, ३१ मार्च, २०२१ रोजी संपलेल्या तिमाहीच्या/वर्षाच्या कंपनीच्या स्वतंत्र आणि एकत्रित लेखापरीक्षित वित्तीय परिणामांवर विचार करण्यासाठी आणि त्यास मंजुरी देण्यासाठी, आणि कंपनीच्या इक्विटी समभागांवर लाभांश देण्याची शिफारस करण्यासाठी, कंपनीच्या संचालक मंडळाची सभा **शुक्रवार, दिनांक ३० एप्रिल, २०२१** रोजी आयोजित करण्यात आली आहे.
सदर सूचना कंपनीच्या वेबसाईटवर http://www.ril.com येथे उपलब्ध आहे आणि स्टॉक एक्सचेंजच्या वेबसाईट्स वर http://www.bseindia.com आणि http://www.nseindia.com येथे देखील उपलब्ध आहे.
रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड करिता
सही/-
सावित्री पारेख
जॉइंट कंपनी सेक्रेटरी आणि
कंप्लायन्स ऑफिसर
स्थळ : मुंबई
दिनांक : २३ एप्रिल, २०२१
www.ril.com

पश्चिम रेल्वे
विविध स्लीपर्स चे उत्पादन आणि पुरवठा
मुख्य प्रशासकीय अधिकारी (बांधकाम), पहिला मजला, स्टेशन बिल्डिंग चर्चगेट, मुंबई: ४०० ०२०, द्वारे **जाहीरात निविदा सूचना क्र. १९२/ ई-निविदा/ पी.वे/२०२१ दिनाक: २०/०४/२०२१** साठी खालील वस्तूंच्या पुरवठ्यासाठी, फक्त ई-खरेदी प्रणालीमध्ये, निविदा मागविण्यात आल्या आहेत:- **निविदा क्र.: डब्ल्यूटीआर/एस ॲंड सी/१७/२०२१/८१९५. संक्षिप्त वर्णन:** पीएससी टी/आउटचे उत्पादन व पुरवठा विशेष स्लीपर आणि अधिक रुंद स्लीपर: **(ए)** १६ मधील १, टी-५६९१ = १८ सेट्स. **(बी)** १२ मधील १, टी -४२१८ = ६०० सेट्स. **(सी)** ८.५ मध्ये १, टी -४८६५ = ९५ सेट्स. **(डी)** ट्रॅप. टी-६०६८ = ३८ सेट्स. **(ई)** ब्रिज, टी -४०८८ = ३९०० नग. **(एफ)** ब्रिज अप्रोच टी -४०८९ ते ४०९७ = ९९ सेट्स. **(जी)** एसईजे, टी -४१४९ = ८८० नग. **(एच)** कर्व्ह, टी-४१७० ते ४१७३ = १०६३ नग. **(आय)** ब्रिज स्लीपर (अधिक रुंद), टी -८६७२ = ५५०१ नग. **(जे)** ब्रिज अप्रोच स्लीपर (अधिक रुंद), टी-८६७२ ते ८६८० = ५२ सेट्स. **(के)** कर्व्ह स्लीपर (अधिक रुंद), टी-८६२१ ते ८६२४ = १३४० नग. **(एल)** एलसी स्लीपर (अधिक रुंद), टी-८६७१ = २३२ नग. **उघडण्याची तारीख:** ११/०५/२०२१ रोजी सकाळी ११:३० वाजता. **निविदा किंमत (अंदाजे):** ₹ ४२,८४,८८,६६०.७०. **टीप:** तपशीलवार निविदा अटी/शुध्दीपत्रकासाठी, काही असल्यास, कृपया **www.ireps.gov.in** आणि **www.wr.indianrailways.gov.in** वर भेट द्या.
0043
आम्हाला लाइक करा: facebook.com/WesternRly

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
सण लोकशाहीचा...
निर्धार ग्रामविकासाचा !
राष्ट्रीय पंचायत राज दिन
२४ एप्रिल
लोकशाहीचा पाया भक्कम होण्यासाठी पंचायत राज आले.
सत्तेचे विकेंद्रीकरण होऊन गाव कारभारात लोकसहभाग वाढला.
विकासाच्या वटवृक्षाने गाव स्वयंपूर्ण झाले.

- राज्यातील ग्रामीण गृहनिर्माण योजनेमध्ये गतिमानता व गुणवत्ता आणण्यासाठी राज्यात महाआवास अभियान सुरु
- महाआवास अभियानात ७ लाख ४१ हजार घरकुल बांधकामे, त्यापैकी 3 लाख ५0 हजार घरकुले पूर्ण तर 3 लाख ९१ हजार घरकुलांचे बांधकाम पूर्णत्वाच्या मार्गावर
- राज्यातील ग्रामीण महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी संघटनातून समृध्दीकडे या ध्येयाने राज्यात महासमृध्दी महिला सक्षमीकरण अभियान प्रगतीपथावर
- महासमृध्दी महिला सक्षमीकरण अभियानात महिलांच्या सक्षम संस्था निर्मीती, मुलभुत व कौशल्य प्रशिक्षण, उद्योगनिर्मीतीसाठी निधी / कर्ज, उत्पादनांचे ब्रँडींग, पॅकेजिंग, मार्केटिंग इत्यादी बाबींचा समावेश
- ग्रामीण भागातील ३०० चौ.मी. पर्यतच्या भुखंडावरील इमारत बांधकामास परवानगीची आवश्यकता नाही
- पंधराव्या वित्त आयोगाचा १०% निधी आता जिल्हा परिषद व १०% निधी पंचायत समित्यांनाही मिळणार. पंधराव्या वित्त आयोगाचा रू.रू.५८२७ कोटी निधी जिल्हा परिषद , पंचायत समिती व ग्रामपंचायत यांना वितरीत
- मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेच्या टप्पा-२ मध्ये १०,००० कि. मी. लांबीच्या रस्त्यास मान्यता
- पंतप्रधान ग्राम सडक योजना टप्पा-३ मध्ये २५८१.६२ कि.मी. लांबीच्या रस्त्यांना मान्यता

घंटागाडी क्रमांक-1
ग्रामपंचायत
घरकुल मार्ट
घरकुल मार्ट
घरकुल मार्ट

माझे गाव... माझी जबाबदारी !
"कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी घरीच रहा, सुरक्षित रहा, अफवांवर विश्वास ठेवू नका, शासकीय आदेशांचे पालन करा".
"मास्क वापरा, हात साबणाने वारंवार स्वच्छ धुवा, सुरक्षित अंतर पाळा"
"कोरोना विषाणूच्या संकटावर आपल्या सर्वांच्या प्रयत्नातून व सहकार्यातून आपण निश्चितपणे मात करु, असा मला विश्वास आहे. "
श्री. उध्दव बाळासाहेब ठाकरे
मा. मुख्यमंत्री
"पंचायत राज दिनानिमित्त सर्वांना शुभेच्छा"
श्री. अजित पवार
मा. उपमुख्यमंत्री
श्री. हसन मुश्रीफ
मा. मंत्री (ग्रामविकास व कामगार)
श्री. अब्दुल सत्तार
मा. राज्यमंत्री, ग्रामविकास
ग्रामविकास व पंचायतराज विभाग, महाराष्ट्र शासन
डिजीआयपीआर /२०२१-२२/२२८